गरोदर मातेवरील मानसोपचार बाळासाठी लाभदायक

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : गरोदरपणात महिलांमधील नैराश्यावर वेळेत उपचार केल्यास जन्माला येणाऱ्या बाळाच्या मेंदूच्या विकासावर त्याचा सकारात्मक परिणाम होतो, असा निष्कर्ष एका संशोधनातून समोर आला आहे. 'नेचर कम्युनिकेशन्स' या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

या अभ्यासाअंतर्गत गरोदरपणात नैराश्याची लक्षणे दिसणाऱ्या २३४ महिलांचा समावेश करण्यात आला होता. संशोधकांनी या महिलांची दोन गटांत विभागणी केली. एका गटाला गरोदरपणातील नैराश्यावर विशेष तयार करण्यात आलेली 'मॉमकेअर' ही ८ सत्रांची संक्षिप्त मानसोपचार थेरपी देण्यात आली, तर दुसऱ्या गटाला केवळ मानसिक आरोग्याबाबत सामान्य मार्गदर्शन व सुविधांची माहिती देण्यात आली. संशोधनात दिसून आले की, मॉमकेअर थेरपी घेतलेल्या महिलांमध्ये गरोदरपणातील नैराश्याचे प्रमाण ३६ टक्क्यांवरून थेट ६ टक्क्यांपर्यंत खाली आले.

एमआरआय चाचणीद्वारे जन्मानंतर लगेचच बाळांच्या मेंदूची पाहणी केली असता, मॉमकेअर थेरपी घेतलेल्या मातांच्या बाळांच्या 'हिप्पोकॅम्पस' या भागाचा आकार दुसऱ्या गटातील बाळांच्या तुलनेत ५ टक्क्यांनी लहान असल्याचे आढळले.

जन्मानंतर ६ महिन्यांनी घेतलेल्या चाचण्यांमध्ये, या हिप्पोकॅम्पसचा आकार लहान असलेल्या बाळांनी अनोळखी व भीतीदायक परिस्थितींमध्ये अधिक चांगला भावनिक संयम दाखवला. बालपणात हा आकार नियंत्रित असणे भावनिक स्थिरतेसाठी फायदेशीर ठरते.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बैंक
गृह कर्ज
@7.25% p.a.
शून्य प्रक्रिया आणि कर्ज सुविधा शुल्क
ऑफर मर्यादित कालावधी साठी

Dr.Manasi mantra
Dr. Manasi's Tanvi Herbals Clinic
हिरण्या नाईट रिपेअर क्रिम
सुरकुत्या?
चेहऱ्यावर काळे डाग ?
निस्तेज त्वचा ?
यष्टिमधु अर्क युक्त
दररोज रात्री मसाज करा.
mantra Himaya
DR. Manasi तन्वी हर्बल क्लिनिक 9920149535 | www.drmanasimantra.com

केवळ निवडणुकीच्या दिवशी दारूबंदी

चार दिवसांच्या बंदीचे आदेश रद्द

नागपूर : महाराष्ट्र विधान परिषदेच्या नागपूर पदवीधर मतदारसंघात केवळ निवडणुकीच्या दिवशी, म्हणजेच २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंतच दारूबंदी राहील, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सोमवारी दिला. तसेच, चार दिवसांसाठी दारूबंदी जाहीर करणारे जिल्हा प्रशासनाचा आदेश अवैध ठरवून रद्द केले.

या प्रकरणावर न्या. उर्मिला जोशी-फाळके व न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी १५ ऑक्टोबर रोजी, तर नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांनी १६ ऑक्टोबर रोजी आदेश जारी केले होते. नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यांत २१ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजेपासून २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत, तसेच २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दारूची दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. या आदेशांविरोधात नागपूरमधील सुमेरकुमार जयस्वाल आणि इतर, तसेच चंद्रपूर जिल्हा मद्य विक्रेता संघटनेने ॲड. सुमित बोदलकर व ॲड. पार्थ मालविया यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशांमधील मनमानीपणा तसेच यापूर्वीच्या विविध न्यायालयीन निर्णयांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले.

राहुल बोंद्रे यांच्या मागे नोटिसांचा ससेमिरा

(पान १ वरून)

येण्याची चिन्हे आहेत.बोंद्रे गेल्या काही दिवसांपासून राजकीय घडामोडींमुळे चर्चेत आहेत. ज्या भाजपविरोधात त्यांनी वर्षानुवर्षे लढा दिला, आंदोलने केली, त्याच पक्षात प्रवेश करण्याची घोषणा त्यांनी केली होती. २० सप्टेंबरला 'फेसबुक लाइव्ह'च्या माध्यमातून त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार, २२ सप्टेंबरला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आदींच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा होणार होता. यासाठी बोंद्रे यांनी जय्यत तयारी केली होती. शेकडो वाहनांचीही व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, ऐनवेळी नाट्यमय राजकीय घडामोडी घडल्या. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि बोंद्रे यांच्यात फोनवरून संवाद झाला. या चर्चेदरम्यान बोंद्रे यांनी काँग्रेसमध्येच राहण्याचा शब्द राहुल यांना दिला. त्यामुळे बोंद्रे यांचा संभाव्य भाजप प्रवेश आणि त्यानंतर प्रवेश टाळण्याचा निर्णय या दोन्ही घडामोडी राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरल्या. आता काँग्रेसमध्येच राहण्याचा निर्णय घेतलेल्या बोंद्रे यांच्या संस्थांना पोलिसांकडून चौकशीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

स्थानिक माशांच्या ३० ते ३५ प्रजाती नामशेष

(पान १ वरून) महाशीरचे दहा लाख, तर रोहू, कटला आणि मृगळ या प्रमुख भारतीय माशांचे दहा लाख मत्स्यबीज सोडण्यात आले. दख्खन महाशीरच्या संवर्धनासाठी टाटा पॉवरचे सहकार्य घेण्यात आले आहे. या माशाला 'रिव्हर टायगर' म्हणूनही ओळखले जाते. उजनी जलाशयातील स्थानिक माशांची संख्या घटण्यामागे परकीय आक्रमक माशांच्या प्रजाती, वाढते प्रदूषण आणि लहान जाळ्यांचा वापर करून केली जाणारी मासेमारी ही प्रमुख कारणे असल्याचे बीएनएचएसने नमूद केले आहे. या समस्येवर उपाय म्हणून संस्थेने १२ स्थानिक, प्रदेशनिष्ठ आणि संकटग्रस्त माशांच्या प्रजातींच्या संवर्धनासाठी प्रजनन कार्यक्रम राबवला. पश्चिम घाटातील हिरण्यकेशी, कोयना आणि पंचगंगा नद्यांमधून या प्रजातींचे प्रजननक्षम नमुने आणून नियंत्रित वातावरणात त्यांचे प्रजनन करण्यात आले. त्यातून तयार झालेली मत्स्यबीजे उजनी जलाशयात सोडण्यात आली. स्थानिक प्रजातींचे पुनरुज्जीवन झाल्यास जलपरिसंस्थेतील अन्नसाखळी मजबूत होण्यास आणि बदलत्या हवामानाच्या परिणामांना तोंड देण्याची क्षमता वाढण्यास मदत होईल, असा संस्थेचा दावा आहे.

१७८ टन मासे काढले : केवळ मत्स्यबीजे सोडून जलाशयाची स्थिती सुधारणार नसल्याने अधिवास पुनर्स्थापनेवरही भर देण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२५ पासून बीएनएचएसने स्थानिक मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था आणि राज्याच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहकार्याने १७८ टनांहून अधिक परकीय आक्रमक मासे जलाशयातून काढले आहेत. यात 'सकरमाउथ कॅटफिश' आणि 'आफ्रिकन कॅटफिश' या प्रजातींचा समावेश आहे.

रेल्वेत मोठ्या आवाजात गाणी ऐकल्यास दंड

मुंबई : रेल्वे प्रवासादरम्यान मोबाइलवर मोठ्या आवाजात गाणी ऐकणे, ध्वनिचित्रफीत पाहणे किंवा मोठ्याने बोलून सहप्रवाशांना त्रास देणे महागात पडू शकते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी मध्य रेल्वेच्या वतीने संबंधित प्रवाशांकडून पाच हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

लांब पल्ल्याच्या गाड्यांसह उपनगरी रेल्वेगाड्यांमध्येही काही प्रवासी मोबाइलवर मोठ्या आवाजात गाणी ऐकतात, ध्वनिचित्रफीत पाहतात किंवा ध्वनिक्षेपकावर संभाषण करतात. अनेकदा हेडफोनचा वापर न करता गाणी, बातम्या आणि अन्य ध्वनिचित्रफीत सुरू ठेवल्याने डब्यातील इतर प्रवाशांना त्रास सहन करावा लागतो. विशेषतः रात्रीच्या प्रवासात व्यत्यय येतो. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी रेल्वेच्या विविध विभागांकडून जनजागृती करण्यात येणार असून, ध्वनिक्षेपक यंत्रणेद्वारे प्रवाशांना सूचना दिल्या जाणार आहेत. दक्षिण रेल्वेने परिपत्रकात आपल्या विभागांना प्रवाशांमध्ये जनजागृती करण्याचे निर्देश दिले आहेत. रेल्वे गाड्या किंवा रेल्वे परिसरात मोबाइलच्या स्पीकरवर मोठ्या आवाजात गाणी अथवा चित्रफीत सुरू ठेवणे, तसेच मोठ्याने बोलून इतरांना त्रास देणे यांसारख्या प्रकारांवर कारवाई केली जाऊ शकते. यासाठी पाच हजार रुपयांपर्यंत दंडाची तरतूद करण्यात आली आहे.

पहिल्यांदा समज, नंतर कारवाई

रेल्वे मंडळाच्या सूचनांनुसार तिकीट तपासनीस, रेल्वे सुरक्षा बलाचे (आरपीएफ) जवान; तसेच कॅटरिंग आणि अन्य ऑन-बोर्ड कर्मचाऱ्यांना डब्यातील संबंधित प्रवाशांना सूचना देण्यास सांगण्यात आले आहे. मोबाइलचा आवाज कमी करणे, हेडफोनचा वापर करणे आणि सहप्रवाशांच्या सोयीचा विचार करणे, याबाबत प्रवाशांना सूचना दिली जाईल. समज देऊनही एखादा प्रवासी नियमांचे उल्लंघन करत राहिल्यास त्याच्यावर कारवाई केली जाऊ शकते.

वैद्यकीय शिक्षण संचालनालयाचे सात संवर्ग संपुष्टात

पुढील वर्षानंतर ५२१ पदांवरील भरती बंद करण्याचा निर्णय

महेश बोकडे, लोकसत्ता

नागपूर : सरकारी कामकाजात तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि प्रशासकीय पुनर्रचनेचे कारण पुढे करत राज्य सरकारने वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयातील सात संवर्ग संपुष्टात आणण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे एकूण ५२१ मंजूर पदांवरील भरतीचा मार्ग बंद होणार आहे. चार संवर्गांतील १०६ पदे तातडीने मृत संवर्ग घोषित करण्यात आली असून, लघुलेखकांच्या तीन संवर्गांतील ४१५ पदांसाठी मात्र वर्षभराची मुदत देण्यात आली आहे. सरकारी नोकऱ्यांच्या संधी कमी करणाऱ्या या निर्णयामुळे भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांना फटका बसणार आहे.

लोहार, दूरध्वनी चालक, नळ कारागीर आणि जोडारी या संवर्गांना ८ ऑक्टोबरपासून मृत संवर्ग घोषित करण्यात आले आहे. यात लोहारांची ८, दूरध्वनी चालकांची ७६, नळ कारागिरांची १४ आणि जोडारींची ८ पदे आहेत. ही पदे रिक्त झाल्यानंतर त्यावर नव्याने भरती केली जाणार नाही. उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक आणि लघुटंकलेखक या संवर्गांतील ४१५ मंजूर पदांबाबत सरकारने ८ सप्टेंबर २०२७ पर्यंतची मुदत निश्चित केली आहे. या कालावधीत रिक्त पदे जुन्या सेवाप्रवेश नियमांनुसार भरता येतील. त्यानंतर हे संवर्गही संपुष्टात येतील.

रिक्त पदांची मागणीपत्रे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तातडीने पाठवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे संबंधित संवर्गांतील सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांचे सेवाविषयक लाभ अबाधित राहणार आहेत. मात्र, पदे रिक्त होत जातील तशी ती संपुष्टात आणली जातील. त्यामुळे भविष्यात या पदांवर नोकरीची संधी उपलब्ध होणार नाही. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने ८ ऑक्टोबरला हा शासन निर्णय जारी केला आहे.

याबाबत वैद्यकीय सचिव धीरज कुमार आणि आयुक्त अनिल भंडारी यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही. दोन्ही अधिकाऱ्यांना भ्रमणध्वनीवर लघुसंदेश आणि व्हॉट्सॲपद्वारे बाजू विचारली, परंतु प्रतिसाद मिळाला नाही.

> सरकारकडून स्थायी पदे कमी करून कंत्राटीकरणाद्वारे खासगी कंपन्यांचे भले करण्याचा घाट घातला जात आहे. यामुळे आरक्षण संपुष्टात येईल आणि मागासवर्गीयांचे खच्चीकरण होईल. सरकारने हा निर्णय मागे घेऊन सर्व रिक्त पदे तातडीने भरावीत.
> **– प्रेम बोबडे, प्रदेशाध्यक्ष,** राष्ट्रीय मुलनिवासी बहुजन कर्मचारी संघ.

मतदान सक्तीसाठी कायदा करावा – आठवले

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : मतदान सर्वांना करणे अनिवार्य करायला हवे असून त्यासाठी कायदा करण्याची मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा आरपीआयचे (आठवले गट) राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केली.

आठवले म्हणाले, याबाबत मी संसदेत निवेदन केले आहे. त्याच प्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन दिले. सीमेवरील सैनिक किंवा अधिकारी हे पोस्टाद्वारे मतदान करतात. त्याचप्रमाणे दिव्यांग, ज्येष्ठांना तशी सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. मतदान प्रत्येकाने करण्याची गरज आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले. त्यांनीही धर्मांतर केले. तशी तरतूदच आहे. पण त्यांचे धर्मांतर हे संविधानाच्या चौकटीत आहे. परंतु बळजबरी, पैशाचे आमिष दाखवून केलेले धर्मांतर हे बेकायदा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्मित संविधान बदलण्याचा अधिकार कुणाला नाही. विरोधक संविधान बदलण्याच्या प्रयत्नात आहे, असा आरोप आठवले यांनी केला.

आंदोलनाने सत्ता परिवर्तन होणार नाही. राहुल गांधी यांना मतपत्रिकेवर मतदान हवे असले तर त्यांनी पंतप्रधानांकडे मागणी करावी, ईव्हीएम हे त्यांचे वडील राजीव गांधी यांनी आणले होते. परंतु ते आता त्यांच्याच गोष्टीचा विरोध करीत असल्याचे आठवले म्हणाले.

'ज्ञानेश कुमार राजीनामा देणार नाही'

ज्ञानेश कुमार यांनी एसआयआरच्या माध्यमातून मतदार यादी शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न केला. १३ कोटी मतदार वगळेत. यातील ६.२ कोटी मतदार हे स्थलांतरित आहेत. तर २.८ मतदार मृत आहेत. तर ३ कोटी मतदार हे बेपत्ता दिसून आलेत. १ कोटी मतदार हे दुबार असल्याचे त्यांनी नावे वगळली. त्यांनी राबवलेल्या प्रक्रियेमुळे बांगलादेशी सुद्धा समोर आले. त्यांना राजीनामा देण्याची गरज नाही. विरोधकांच्या आंदोलनाचा फारसा परिणाम होणार नाही, असे आठवले म्हणाले.

'सवाई गंधर्व महोत्सव' यंदा जानेवारीमध्ये

पुणे : अभिजात संगीताच्या प्रांतामध्ये जगभरात आपली नाममुद्रा उमटविलेला 'सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव' यंदा डिसेंबरऐवजी पुढील वर्षी १३ ते १७ जानेवारी या कालावधीमध्ये होणार आहे. त्याचप्रमाणे फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर प्रथमच या महोत्सवाचे आयोजन होणार आहे.

आर्य संगीत प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी ही माहिती दिली. महोत्सवाचे यंदा ७२ वे वर्ष आहे. इतर तपशील लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही नमूद करण्यात आले आहे.

किराणा घराण्याचे ज्येष्ठ गायक पं. सवाई गंधर्व आणि स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांना समर्पित हा महोत्सव गेल्या पाच वर्षांपासून मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रीडा संकुलामध्ये आयोजित करण्यात येत होता. मात्र, रसिकांच्या मागणीनुसार यंदा महोत्सवाचे स्थळ बदलण्यात आले आहे. दरवर्षी डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात हा महोत्सव रंगतो. मात्र, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर याच कालावधीमध्ये पुणे पुस्तक महोत्सव भरविण्यात येणार आहे.

लोकसत्ता क्लासिफाइड्स

व्यवसाय

शेअर्स

SHARE MAKARAND
CONVERT YOUR
PHYSICAL SHARES TO
DEMAT FOR IEPF CLAIM
CONTACT 9892886221
0050300006-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

धान खरेदीबाबतचा अहवाल अडगळीत

तीन महिन्यांनंतरही कार्यवाही नाही

राजेश प्रायकर, लोकसत्ता

नागपूर : धान खरेदीचे व्यवस्थापन तसेच किमान आधार किंमतीबाबत अभ्यास करण्यासाठी छत्तीसगड राज्यात दौरा करून राज्य सरकारच्या समितीने अहवाल जुलैमध्येच सादर केला. परंतु दुष्काळातही राज्यातील काही भागात खरीप हंगामातील धान काढणीचा हंगाम सुरू झाला. मात्र हा अहवाल अडगळीत पडला आहे. त्यामुळे या अहवालातील शिफारसीचा लाभ यंदा धान उत्पादनकांना होण्याची शक्यता धूसर झाली आहे.

राज्यात पूर्व विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात धानाची शेती होते. पूर्व विदर्भात भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली, नागपूर व यवतमाळच्या काही भागांत तर कोकणात रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर तसेच पश्चिम महाराष्ट्रात पुणे, कोल्हापूर, सातारा, नाशिक, अहमदनगर येथे धानाची शेती केली जाते. मराठवाडा आणि खान्देश हा प्रामुख्याने कमी पावसाचा प्रदेश असला तरी नांदेड, लातूर, बीड, परभणी, हिंगोली, धुळे या भागातही धानाची शेती केली जाते. धानाचा हमीभाव व देयकांसाठी शेतकऱ्यांना आंदोलने करावी लागते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात अल्पकालीन चर्चेदरम्यान आमदार परिणय फुके यांनी हा प्रश्न लावून धरला होता. त्यावर उत्तर देताना राज्य सरकारने किमान आधारभूत किंमत अध्ययन समिती स्थापन केली होती. या समितीने छत्तीसगडमध्ये धान खरेदी व्यवस्थेतील विविध पैलूंचा बारकाईने अभ्यास केला. त्या आधारावर अहवाल जुलैमध्ये अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांच्याकडे सोपवला. यातील शिफारसी राज्यात लागू कराव्यात, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

यंदा पाऊस कमी होऊनही शेतकऱ्यांनी खरीप हंगामात कशीबशी भाताची लागवड केली. विशेषतः सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संकटकाळात धान वाढवला. आता तो काढणीला आला. परंतु अद्यापही हा अहवाल अडगळीत पडला आहे.

अहवालातील शिफारसी

- या अहवालात धान खरेदी प्रक्रियेदरम्यान बारदाना व्यवस्थापन, नवीन व जुन्या बारदान्यांचा हिशेब, धान खरेदी केंद्रांची कार्यपद्धती, शेतकऱ्यांना ४८ तासांत मोबदला देण्याची व्यवस्था तसेच निधी उपलब्धतेसाठी करण्यात येणारे बँकिंग नियोजन, खरेदी प्रक्रियेत पारदर्शकतेसाठी आणि कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार होऊ नये यासाठी विकसित करण्यात आलेल्या आसीसी प्रणालीची शिफारस करण्यात आली आहे.

मंत्र्यांकडून प्रतिसाद नाही

- अहवालाच्या सद्यस्थितीबाबत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ आणि अतिरिक्त मुख्य सचिव संजीवकुमार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांना लघुसंदेशही पाठवण्यात आले. मात्र, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

गडचिरोलीतील दीड लाख कोटींचे प्रकल्प अधांतरी!

(पान १ वरून)

व्यक्त केली जात आहे. लॉयड्स मेटल्सचा कोनसरी प्रकल्प सुरू झाला असून, सूरजागड इस्पातचा प्रकल्प प्रक्रियेत आहे.

मुख्यमंत्र्यांची कसोटी

राज्याचे मुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठीही ही परिस्थिती कसोटीची ठरणार आहे. रोजगार व औद्योगिक विकासाची आश्वासने देण्याबरोबरच जमीन, पुनर्वसन, पर्यावरण व आदिवासींच्या हक्कांबाबतच्या प्रश्नांवर तोडगा काढल्याशिवाय गडचिरोलीच्या 'स्टील हब'चे स्वप्न साकार होणे कठीण असल्याचे चित्र आहे.

IndusInd Bank
पहिला मजला, संगम टॉवर,
चर्च रोड, जयपूर – 302001.

सोन्याच्या ई-लिलावाची जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की खाली नमूद कर्जदार व इतरांनी इंडसइंड बँक लिमिटेड यांचेकडून सुवर्ण कर्ज सुविधा प्राप्त केली. कर्जाच्या परतफेडीमध्ये कसूर केल्याने आणि कराराच्या अटी व शर्तीचा भंग केल्याने या कर्जमधील कर्ज आता खुल्या जाहीर लिलावासाठी काढण्यात आले आहे. संबंधित लिलावातील रक्कम / बोली रक्कम कर्जदारांच्या संबंधित कर्ज खात्यांमध्ये आणि लिंक केलेल्या कर्ज खात्यांमध्ये जमा करण्यात येईल.
तारण ठेवलेले या सोन्याची विक्री ''जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे काही आहे आणि तेथे जे काही आहे'' तत्त्वावर करण्यात येईल. लिलावात सहभागी होण्यास इच्छुक बोलीदारांनी इंडसइंड बँकेच्या www.indusind.com या वेबसाईटवर आणि मान्यताप्राप्त सेवा पुरवठादाराच्या अटी व शर्तीचे पालन करावे.
ग्राहक (अब्दुल माहेविश परवीन) यांचा लिलाव इंडसइंड बँक लि., श्री स्वामी प्लाझा, 97, ईस्ट हाय कोर्ट रोड, रामदास पेठ, नागपूर - 440 010 येथे राबविण्यात येईल.
ग्राहक (अब्दुल माहेविश परवीन) यांचा लिलाव इंडसइंड बँक लि., श्री स्वामी प्लाझा, 97, ईस्ट हाय कोर्ट रोड, रामदास पेठ, नागपूर - 440 010 येथे राबविण्यात येईल.
ग्राहक (अब्दुल माहेविश परवीन) यांचा लिलाव इंडसइंड बँक लि., श्री स्वामी प्लाझा, 97, ईस्ट हाय कोर्ट रोड, रामदास पेठ, नागपूर - 440 010 येथे राबविण्यात येईल.
बोली दस्तावेज, शपथपत्र, सामान्य अटी व शर्ती इंडसइंड बँकेच्या वेबसाईटवर म्हणजे https://www.Indusind.com येथे येथे उपलब्ध आहेत आणि खाली नमूद शाखेतून प्राप्त करता येतील.
विक्रीच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्याचा किंवा दुरुस्ती करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवतात.

सुवर्ण कर्ज खाते क्र.	ग्राहकाचे नाव	शाखा	शाखेचा संपर्क क्र.	सोन्याचे वजन ग्राम मध्ये
704001393764	अब्दुल माहेविश परवीन	नागपूर	8830880676	64.85
704001393757	अब्दुल माहेविश परवीन	नागपूर	8830880676	58.1
704001393771	अब्दुल माहेविश परवीन	नागपूर	8830880676	46.2

बोली सादरीकरणाचा शेवटचा दिनांक 25-नोव्हेंबर-26 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत या सूचनेच्या दिनांकापासून.
लिलाव दिनांक आहे 25-नोव्हेंबर-26 रोजी स. 11.00 ते 12.00 वा.
लिलाव सुरु होण्यापूर्वी कर्जाच्या संपूर्ण थकबाकीचा भरणा करण्याचा पर्याय कर्जदारांकडे आहे. तसे करून ते इंडसइंड बँक लि. च्या अटी व शर्तींनुसार तारण ठेवलेले सोने सोडवून घेऊ शकतात.
स्थानः नागपूर, दिनांकः 20.10.2026 प्राधिकृत अधिकारी, इंडसइंड बँक लि.

Central Bank Of India
सेन्ट्रल बैंक ऑफ इंडिया
क्षेत्रिय कार्यालय : 2 रा मजला, ओरिएन्टल बिल्डींग,
एलआयसी चौक, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर.
0712-2548500 / 2527678

ई-लिलाव विक्री सूचना (सरफैसी नियम 2002 अंतर्गत)

परिशिष्टी -IV-ए नियम 6(2) आणि 9(1) सह

04.11.2026 रोजी चल संपत्ति विक्रीकरिता सार्वजनिक सूचना

चल संपत्तीची ई-लिलाव विक्री सुचना सिक्युरिटायझेशन एवं रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स एवं एनफोर्समेंट सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 रुल्स 6(2) आणि 9(1) सोबत वाचला जाणारा सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल 2002. याव्दारे आम जनतेला सार्वजनिक पणे आणि विशेष करुन कर्जदार आणि जमानतदार यांना सुचित केल्या जात आहे की, खालील चल संपत्ती बँककडे गहाण / प्रभाराधीन आहे ज्यांच्या **प्रत्यक्ष ताबा** सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया चे अधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि ''जे आहे जेथे आहे'' ''जे आहे ते आहे'' आणि '' जेही काही आहे'' या तत्त्वावर दि. **04.11.2026** ला ऑनलाईन पोर्टल **https://BAANKNET.com** मार्फत सिक्युरिटी इंटरेस्ट बँकेच्या थकित रक्कम वसुलीसाठी लिलाव (विक्री) करण्याचे ठरविले आहे. आरक्षित रक्कम आणि ईएमडी आणि इतर तपशील खालील तक्त्यात दिलेले आहेत. ई-लिलाव विक्रीचे पूर्ण नियम व अटी बँकेच्या वेबसाईट वर उपलब्ध केलेली आहे. www.centralbankofindia.co.in या वेबसाइटवर भेट देऊ शकतात.

चल संपत्तीचे विवरण

शाखा	कर्जदार आणि जमानतदार यांचे नाव	मागणी रक्कम आणि तारीख	चल मालमत्तेचे विवरण	ताबा घेण्याची तारीख आणि प्रकार	राखीव रक्कम ईएमडी बोली वाढीव रक्कम	शाखा प्रबंधकाचे संपर्क क्रमांक
धरमपेठ शाखा नागपूर	**मेसर्स जी.एम. बस टुर अँड ट्रॅव्हल प्रोप्रायटर गुलाम गौस मोहम्मद इस्माइल पठाण**	**रु. 2,99,70,299.89** (दिनांक **22/05/2025** रोजी देय असलेली मुद्दल रक्कम अधिक व्याज दर्शविणारी रक्कम), तसेच दिनांक **23/05/2025.** पासून पुढील व्याज व इतर आकारांसह.	**Vehicle Details 1** -Manufacturer : Ashok Leyland Ltd, Model No. : TF2513.5F6R, Engine No. : PDPZ508912, Chasis No. : MB1PVELD8PADP9583, Manufacturing Date : 10/2023, Fuel : DIESEL, Color : WHITE, Vehicle Class : BUS, Registration No. : MH31FC8294, Registration Date : 05/06/2024,	**31.08.2026 (प्रत्यक्ष ताबा)**	**रु. 24,00,000/-** **रु. 2,40,000/-** **रु. 20,000/-**	(शाखा प्रमुख) मो. नं. 7507774105
			Vehicle Details 2 - Manufacturer : Ashok Leyland Ltd, Model No. : TF2513.5F6R, Engine No. : PDPZ509025, Chasis No. : MB1PVELD8PADP9566, Manufacturing Date : 10/2023, Fuel : DIESEL, Color : WHITE, Vehicle Class : BUS, Registration No. : MH31FC8295, Registration Date : 05/06/2024,	**31.08.2026 (प्रत्यक्ष ताबा)**	**रु. 24,00,000/-** **रु. 2,40,000/-** **रु. 20,000/-**	

2002 नियम 9(1) अंतर्गत 15 दिवसांची वैधानिक विक्री सुचना

बॅंकेला तपासणीची तारीख : **26/10/2026** ते **27/10/2026** रोजी दु. 12.00 ते दु. 04.00 दरम्यान
मालमत्ता ई-लिलावाची तारीख : **04/11/2026** रोजी स. 10.00 ते दु . 4.00 दरम्यान (10 मिनिटांच्या विस्तारासह)

1. बॅंकेला ज्ञात असलेल्या मालमत्तेचे प्रभार - माहिती नाही.
2. ई-लिलावाच्या विक्रीत भाग घेण्यासाठी, इच्छुक निविदाधारकांनी त्यांचे तपशील सेवा प्रदाता **https://BAANKNET.com** कडे आधीपासूनच नोंदवावेत व त्याचा यूजर आयडी व पासवर्ड मिळवुन घ्यावा. बिडर्सना केवळ पासवर्ड बदलण्याचा सल्ला दिला जात आहे. बिडर्स **https://BAANKNET.com** वर शैक्षणिक विडीओ करीता भेट देवू शकतात. तपशीलवार अटी व शर्तीसाठी कृपया बँकेची वेबसाईट **www.centralbankofindia.co.in** आणि **https://BAANKNET.com** चा संदर्भ घ्यावा.
3. बिडरनी **https://BAANKNET.com** या वेबसाइटवर नोंदणी केल्यानंतर आणि केवायसी कागदपत्रे अपलोड आणि सेवा प्रदात्याने केवायसी कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर ईएमडी फक्त ग्लोबल वॉलेटमध्ये एनईएफटी (चालान जनरेट केल्यानंतर :**https://BAANKNET.com**) जमा करावे.
4. ईच्छुक बोलीदाराने सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, अधिकृत अधिकारी, मो.नं. 8108198179 संपर्क साधावा
5. मालमत्तांच्या तपासणीसाठी कृपया संबंधित शाखा प्रबंधकाशी संपर्क साधावा.
6. सेक्युरिटी इंटरेस्ट नियम (एनफोर्समेंट) नियम, 2002 च्या तरतुदीनुसार या अटी व शर्ती काटेकोरपणे असतील.

कर्जदार / जमानतदार / गहाणदार यांना अशा प्रकारे सुरक्षित लेनदारांच्या थकबाकी वसुलीसाठी चल सुरक्षित मालमत्ता विक्रीसाठी सूचित केले जाते.

दिनांकः 20.10.2026, स्थान : नागपूर (इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल) **सही / - अधिकृत अधिकारी, सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया**